6:42

epaper.esakal.com

होत. त १९९३ मध्ये पुण्यात स्थलांतर आयुक्त पदाकडून सेवानिवृत्त झाले होते. केशवराव भोसले यांच्यावरील त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. केशवराव भोसले नाटयगृहाचे नामकरण संगीतसूर्य केशवराव भोसले नाटयगृह असे व्हावे, नाटयगृहात त्यांचे छायाचित्र कायमस्वरूपी लावावे, तसेच त्यांचे ऐतिहासिक दर्शनी भागात लावावे यासाठी ते आग्रही होते. त्यांचे उत्तरकार्य गुरुवारी (ता. १६) कोल्हापूरमधील प्रतिकल्पना होत्या आहे.

दिव्यांग मुलांना भेट

पुणे, ता. १२ : डॉ. राधाकृष्ण कुलकर्णी आणि मौसमी कुलकर्णी यांनी त्यांच्या आई-वडिलांच्या स्मृतीनिमित्त पैसे फाउंडेशनच्या दिव्यांग मुलांसाठी 'मानसी इको' ही चारचाकी भेट देण्यात आली. या गाडीचा स्वीकार संस्थाचालक अशोक तोडकरे यांनी केला.

पहाण, हस्तांदोलन करण आणि 'निओ'च्या कृती पाहिल्यानंतर 'निओ' नक्की रोबोटच आहे ना? असा प्रश्न मुलांना पडला.

'आयडियाज टू इम्पॅक्ट : सायन्स फॉर द पीपल' या संकल्पनेवर आधारित सहाव्या दोनदिवसीय 'भारत विज्ञान महोत्सवाचा' समारोप रविवारी (ता. १२) फर्ग्युसन महाविद्यालयात झाला. विज्ञान, संशोधन आणि तंत्रज्ञानातील नव्या शक्यता शोधणे तसेच विज्ञानाची गोडी निर्माण करून त्याबद्दल व्यापक जनजागृती करणे, हा या महोत्सवाचा उद्देश होता.

'फाउंडेशन फॉर अॅडव्हान्सिंग सायन्स अँड टेक्नॉलॉजी' (फास्ट इंडिया) आणि वेदांत अँटो लिमिटेड यांच्या सहकार्याने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. चाफळचे ग्रीन व्हेहिकल्स, क्वांटम कॉम्प्युटिंग, कृत्रिम

फर्ग्युसन महाविद्यालय : 'फाउंडेशन फॉर ॲडव्हान्सिंग सायन्स अँड टेक्नॉलॉजी' (फास्ट इंडिया)तर्फे आयोजित भारत विज्ञान महोत्सवात विज्ञान-तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प पाहताना विद्यार्थी आणि पालक.

बुद्धिमत्ता, सार्वजनिक आरोग्य, गणित, शाश्वतता आणि स्टेम सेल्स यांसारख्या विविध विषयांवर ६० हून अधिक तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विज्ञानावर आधारित ३० हून अधिक प्रदर्शने या कार्यक्रमाला येथे आयोजित केल्या होत्या.

कंपनीज अॅक्ट लिमिटेड, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, एमयू एनर्जी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च

- प्राची देशमुख, विद्यार्थी

> विज्ञान-तंत्रज्ञान मानव जातीचे भविष्य आहे, हे पुन्हा एकदा या महोत्सवाच्या निमित्ताने सिद्ध झाले. उद्याच्या जगात स्पर्धा करण्यासाठी आपल्याला समोर कोणती आव्हाने आहेत, याची जाणकारता विद्यार्थ्यांना होण्यासाठी या महोत्सवाने मदत केली.
> - कुमार अभ्यंकर, चालक

पुणे, डेक्कन एज्युकेशन सोसायटी अंतर्गत विविध प्रतिष्ठित संस्थांनी महोत्सवात सहभाग घेतला. विज्ञान चाटण्यातून, वृत्त स्वतंत्रीकरण, वायुविज्ञान, सायन्स क्वीझ, मुलांसाठी विज्ञान - तंत्रज्ञानावर आधारित विविध मनोरंजनाचे उपक्रम राबविण्यात आले.

खासगी दवाखान्यांची तपासणी होणार

पुणे परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालकांचा आदेश

पुणे, ता. १२ : आरोग्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पुणे परिमंडळातील खासगी रुग्णालये, दवाखान्यांची तपासणी सुरू होणार आहे. तसा आदेश पुणे परिमंडळाचे आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार पुणे, सातारा व सोलापूर या तीन जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांना दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून दिला.

'सुधारित बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट २०२१'नुसार कार्यक्षेत्रातील सर्व खासगी आरोग्य संस्थांची तपासणी पंधरा दिवसांत पूर्ण करावी, यासाठी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी व समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष अथवा दूरदृश्यप्रणालीद्वारे

> खासगी रुग्णालयाबाहेर दरपत्रक असले आवश्यक आहे. सर्व ठिकाणचे दर समान नसले तरी ठरविलेले दर जाहीरपणे स्पष्टपणे यावेत. आग प्रतिबंधक उपाययोजनांचा अहवाल आणि वैद्यकीय हलगर्जी विरोधात याबाबत माहिती घ्यावी. रुग्णांचा अभिप्राय घ्यावा. तपासणी झाल्यानंतर त्रुटींमध्ये सुधारणा करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व आरोग्यप्रमुख यांच्या स्वाक्षरीने एका आठवड्यात सुधारणा करण्याची नोटीस द्यावी. त्यानंतर पंधरा दिवसांनी फेरपरीक्षण करावे, असे या आदेशात नमूद केले आहे.
> - डॉ. राधाकिशन पवार, आरोग्य उपसंचालक, पुणे परिमंडळ

आदेश द्यावेत. या तपासणीत जिल्हा परिषदेचे ग्रामीण रुग्णालये, नगरपालिका, ॲसोसीएशन ऑफ सर्व शासकीय डॉक्टरांची व रजिस्टर्ड दवाखान्यांची शहर व ग्रामीण भागात जाऊन तपासणी करावी. किमान एका वैद्यकीय व्यावसायिकांची पाही करावी.

तपासणीचे स्वरूप

- १. गर्भलिंगनिदान कायद्यासाठीची सोनोग्राफी केंद्रे
- २. गर्भपात केंद्रांची तपासणी आणि तेथील रेकॉर्ड
- ३. समुपदेशन केंद्रे, प्रजोत्पादन सहायक तंत्रज्ञान केंद्रे
- ४. खासगी रुग्णालये

सूचित करावे. खासगी रुग्णालयात डॉक्टर, स्टाफ, पेशंटच्या नातेवाइकांची संख्या विश्वासार्हपणे असावी. त्याबाबत नियमित अहवाल व साधनेतपणे रुग्ण कल्याणचे संपर्कसाधक असल्याची खात्री करावी. अशा या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

शनिवार पेठ : सायबर सुरक्षाविषयक उत्कृष्ट कार्यासाठी 'सिक्युअर हिल फाउंडेशन'तर्फे दिल्या जाणाऱ्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सिक्युरिटी' पुरस्काराचे विजेते आणि कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले मान्यवर.

सायबर सुरक्षेवर विद्यापीठात अभ्यासक्रम

› पान १ वरून

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, सायबर शिक्षाचे उप महानिरीक्षक संजय शिंदे आणि 'सिक्युअर हिल फाउंडेशन'च्या अध्यक्षा अनुराधा काटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

'आमे अभ्यासक्रम राबविल्यामुळे सायबर चोऱ्यांची नवी पिढी तयार होईल,' असा विश्वासही राज्यपाल राधाकृष्णन यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, "आधारकार्ड तंत्रज्ञान पुढे जात असताना फसवणुकीचे नवे प्रकार समोर येत आहेत. त्यांची व्याप्तीही तोडून त्यांना पकडण्याचे काम आव्हानात्मक करावे लागणार आहे. जागतिकीकरणामुळेही सायबर गुन्हेगारीचे जाल प्रत्येकाला असणे आवश्यक आहे. दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिक म्हणून कमाकलेला पैसा गमावकर नाही असी चांगला आव्हानात्मक विकसित करावी लागेल. युवकांना झालयाकेला उद्योजक करण्यासोबत त्याला प्रतिबंध करणे आवश्यक आहे."

काटकर म्हणाल्या, "सायबर शिक्षा हा उपक्रम विद्यार्थ्यांना सक्षम करणे आणि सर्वांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी त्यांना पुढे आणण्यासाठी राबविला आहे."

'सायबर शिक्षा फॉर सायबर सिक्युरिटी' उपक्रमात उत्कृष्ट काम केलेले प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी यांना 'सायबर वॉरियर्स पुरस्कार'ने सन्मानित करण्यात आले.

उच्चशिक्षित दांपत्याचा परस्पर संमतीने घटस्फोट

पुणे, ता. १२ : वैचारिक मतभेदामुळे दोन वर्षांपासून वेगळे राहत असलेल्या उच्चशिक्षित दांपत्याचा घटस्फोट अवघ्या १८ दिवसांत कौटुंबिक न्यायालयाने मंजूर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय-निवाड्यानुसार पत्नी संमतीने घटस्फोटाचा दावा दाखल करण्यापूर्वी दोघे १८ महिने वेगळे राहत असल्यास सहा महिन्यांचा कालावधी वगळता येतो. या प्रकरणात दोघे दोन वर्षांपासून वेगळे राहत आहेत. त्यामुळे हा कालावधी वगळण्याची मागणी अर्जदार पक्षिलांनी केली. त्यानुसार न्यायालयाने हा निकाल दिला आहे. २८ डिसेंबर २०२४ रोजी दाखल केलेला दावा २८ जानेवारी २०२५ ला निकाली निघाला.

या जोडप्याने ॲड. प्रतीक आहेरे आणि ॲड. प्राजक्ता गवलगत यांच्यामार्फत कौटुंबिक न्यायालयात परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. हे जोडपे उच्चशिक्षित आहेत. दोघेही नोकरी करतात. जानेवारी २०१६ मध्ये दोघांचा विवाह झाला. त्यांना दोन वर्षांचा मुलगा आहे. वैचारिक मतभेदामुळे डिसेंबर २०२२ पासून ते दोघे वेगळे राहत आहेत. दोघांनी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने तो मंजूर केला. निकालानुसार मुलगा आईकडे असणार आहे. मात्र, वडील त्याला भेटू शकणार आहेत. पोटगीबाबत दोघांत कसलीही देवाण-घेवाण नाही.